अतुल वारे, जातेगाव, करमाळा.

☐ सचिनने कोणकोणत्या हिंदी चित्रपटांत नायकाची भूमिका केली? नायिका कोण?

– *गीत गाता चल* (सारिका), *बालिका वधू* (रजनी शर्मा), *रक्षाबंधन*, *जिद्द* (सारिका), *आँख का तारा* (बिंदिया गोस्वामी), *बोलो हे चक्रधारी* (रजनी शर्मा), *श्याम तेरे कितने नाम* (सारिका), *अखियों के झरोके से* (रंजीता), *अंजाम* (सारिका), *कॉलेज गर्ल* (बिंदिया गोस्वामी), *मधुमालती* (सारिका), *त्रिशूल* (पूनम धिल्लाँ), *और कौन?* (रजनी शर्मा), *दिल का हीरा* (नंदिता बोस), *गोपालकृष्ण* (झरीना वहाब), *जान ए बहार*, *प्रतिमा और पायर्ल* (सारिका), *द ॲडव्हेंचर्स ऑफ अल्लादिन* (नाझनीन), *जाये तो जाये कहाँ* (सारिका), *स्वीटी* (रजनी शर्मा), *नदिया के पार* (साधना सिंह), *सत्ते पे सत्ता* (रंजीता), *दिलबर* (किम), *घरद्वार* (श्रद्धा वर्मा), *पिया मिलन* (साधना सिंह), *सूरसंगम*, *तुलसी* (साधना सिंह).

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

☐ दादा धर्माधिकारी यांनी कोणकोणते मराठी व हिंदी चित्रपट दिग्दर्शित केले?

– *माया बाजार, बाळा जो जो रे, कुंकवाचा धनी, अखेर जमलं, चिमणी पाखरं, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, महात्मा, सौभाग्य, आलिया भोगासी, पतिव्रता, लग्नाला जातो मी, एक धागा सुखाचा, कलंक शोभा, क्षण आला भाग्याचा, सप्तपदी, विठू माझा लेकुरवाळा, सुभद्रा हरण, वैशाख वणवा, थांब लक्ष्मी कुंकू लावते, सतीचं वाण, नसती उठाठेव, भक्त पुंडलीक, धाकटी मेहुणी, सतीची पुण्याई* हे मराठी व *मायाबाजार, नन्हे मुन्ने, भाग्यवान, महात्मा, सावधान, सुदर्शन चक्र, दीप जलता रहे, मुझे सीने से लगालो, सुभद्राहरण* हे हिंदी चित्रपट दादा धर्माधिकारींनी दिग्दर्शित केले.

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम, मुंबई.

☐ *स्वीकार* हा चित्रपट कधी प्रदर्शित झाला होता? संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक व कलाकार कोण?

– *स्वीकार* १९७३ला आला होता. संगीतकारः लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माताः सी. डी. शहा, हरीश उपाध्याय, दिग्दर्शकः सुधेन्द्रू रॉय, कलाकारः हंसा मेकर, महेंद्र संधू, नमिता कपूर, राज मेहरा, ए.के.हंगल.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

☐ *आबे हयात, पायल, एक शोला, उडन खटोला, शान-ए-हातिम, शोला और शबनम, नियाज और नमाज, दाग* या चित्रपटाचे नायक-नायिका, दिग्दर्शक व संगीतकार कोण?

– *आबे हयात* या नावाचा चित्रपट दोनदा आलाय. पहिला १९३३ला. नायकः नझीर, नायिकाः नूरजहाँ, दिग्दर्शकः हमीद अली, संगीत के.सी.डे. १९५५ला दुसरा. नायक-नायिकाः प्रेमनाथ-शशिकला, दिग्दर्शकः रमण देसाई, संगीतः सरदार मलिक. *पायल* या नावाचा चित्रपट आतापर्यंत तीन वेळा आलाय. पहिला १९४६ला. नायक-नायिकाः निहाल-पारो, दिग्दर्शकः डी.बाबुलाल. संगीतः शौकत देहलवी (नंतर नाशाद या नावाने संगीत देणारे) दुसरा १९५७ला. नायक-नायिकाः सुनील दत्त, पद्मिनी, दिग्दर्शकः जोसेफ तलीथ, संगीतः हेमंतकुमार, तिसरा १९९२ला नायक-नायिकाः हिमालय-भाग्यश्री, दिग्दर्शकः महेंद्र शहा, संगीतः नदिम-श्रवण. *एक शोला* १९५८ला आला होता. नायक-नायिकाः प्रदीपकुमार-माला सिन्हा, दिग्दर्शकः चंदर सहगल, संगीतः मदनमोहन, *उडन खटोला* १९५५ला आला होता. नायक-नायिकाः दिलीपकुमार-निम्मी, दिग्दर्शकः एस.यू.सन्नी, संगीतः नौशाद, शान-ए-हातिम, १९५८ला आला होता. नायक-नायिकाः दलजीत-चित्रा, दिग्दर्शकः नानुभाई वकील, संगीतः ए.आर.कुरेशी, *शोला और शबनम* दोनदा आला. पहिला १९६१ला नायक-नायिकाः धर्मेंद्र-तरला, दिग्दर्शकः रमेश सायगल, संगीतः खय्याम, दुसरा १९९२ला नायक-नायिकाः गोविंदा-दिव्या भारती, दिग्दर्शकः डेव्हिड धवन, संगीतः भप्पी लाहिरी, नियाज और नमाज, १९७७ला आला होता. नायक-नायिकाः परिक्षित साहनी-जाहीरा, दिग्दर्शकः ए. समशीर, संगीतः श्यामजी-घनश्यामजी. *दाग* दोनदा आला. पहिला १९५२ला नायक-नायिकाः दिलीपकुमार-निम्मी, दिग्दर्शकः अमिया चक्रवर्ती, संगीतः शंकर-जयकिशन. दुसरा १९७३ला. नायक-नायिकाः राजेश खन्ना-शर्मिला टागोर व राखी, दिग्दर्शकः यश चोप्रा, संगीतः लक्ष्मीकांत-प्यारेलाल.

सौ. सुधा अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

☐ मनीषा कोईरालाचा पहिला चित्रपट कोणता?



सौदागरमध्ये मनीषा कोईराला-विवेक मुशरन

– मनीषा कोईरालाचा पहिला चित्रपट सुभाष घई दिग्दर्शित *सौदागर*.

☐ *शाहीर परशुराम, मानिनी, काय हो चमत्कार, आई, नार निर्मिते नरा* या चित्रपटातील नायक-नायिका कोण? दिग्दर्शक कोण?

– *शाहीर परशुराम* नायक-नायिकाः गजानन जागीरदार-जयश्री गडकर, दिग्दर्शकः अनंत माने. *मानिनी* नायक-नायिकाः चंद्रकांत गोखले-जयश्री गडकरं, दिग्दर्शकः अनंत माने. *काय हो चमत्कार* नायक-नायिकाः अरुण सरनाईक-जयश्री गडकर, दिग्दर्शकः अनंत माने. *आई* या नावाचा चित्रपट दोनदा आला. पहिला १९८१ला नायक-नायिकाः कुलदीप पवार-उषा नाईक, दिग्दर्शकः अनंत माने. दुसरा १९९५ला नायक-नायिकाः दिलीप-नीना कुलकर्णी, दिग्दर्शकः महेश मांजरेकर. *नार निर्मिते नरा* नायक-नायिकाः रमेश देव-जयश्री गडकर, दिग्दर्शकः अनंत माने.

☐ युद्धाच्या पार्श्वभूमीवरील पहिला हिंदी चित्रपट कोणता?

– शांतारामबापूंचा १९४६चा *डॉ. कोटणीस की अमर कहानी*. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील एका सत्यघटनेवर हा चित्रपट आधारलेला होता.

प्रभा पां. दाते, दादर.

☐ जयश्री गडकर व सीमा यांनी कोणकोणत्या चित्रपटांत एकत्र भूमिका केलीय?

– *झनक झनक पायल बाजे*मध्ये त्या दोघी समूह नृत्यात एकत्र होत्या. *आलिया भोगासी* या चित्रपटात त्या दोघींनी एकत्र भूमिका केली होती.

प्रकाश घाटगे, कोल्हापूर.

☐ *इज्जत*मध्ये धर्मेंद्रचा डबल रोल होता. त्याची एक नायिका आहे तनुजा, दुसरी नायिका कोण?

– तामीळनाडूचे राजकारण आपल्या इशाऱ्यावर हलवणाऱ्या जयललिता. ●